आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता
२७ फेब्रुवारी २०२५ गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाकुंभ हा देशाच्या एकतेचा महायज्ञ असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे गौरवोद्गार

- एसटी महामंडळाच्या सर्व बसगाड्यांमध्ये CCTV लावण्याचे परिवहन मंत्र्यांचे आदेश

- युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन दर लेयन भारताच्या दौऱ्यावर

**आणि**

- ऑस्कर पुरस्कार प्राप्त हॉलिवूड अभिनेते जीन हॅकमॅन यांचं निधन

**<><><><><>**

महाकुंभ हा देशाच्या एकतेचा महायज्ञ असून देशाला त्याच्या हजारो वर्षाच्या परंपरेचा गर्व आहे. देश एका नव्या ऊर्जेसह पुढे जात आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रयागराजमध्ये महाकुंभाची सांगता झाल्यानंतर आज प्रधानमंत्र्यांनी आपल्या भावना त्यांच्या समाजमाध्यमावरच्या ब्लॉगमध्ये व्यक्त केल्या. देशाचं नवं भविष्य लिहिण्याचा हा काळ आहे. महाकुंभाला आलेले कोट्यावधी लोक हा केवळ एक विक्रम नसून तो समृद्ध भारतीय परंपरेचा पाया आहे. येणाऱ्या शतकांमध्ये देशाची परंपरा आणि भारतीय संस्कृती अधिक समृद्ध आणि सशक्त होईल. महाकुंभाचे यशस्वी आयोजन हे व्यवसायिक आयोजक आणि धोरणकर्त्यांसाठी एक अभ्यासाचा विषय असून जगात इतक्या मोठ्या

प्रमाणात कोणत्याही कार्यक्रमाचं आयोजन केलं जात नाही असंही त्यानी सांगितल.

<><><><><>

सागरी व्यापार ही जागतिक पुरवठा साखळीतली महत्त्वाची कडी आहे. त्याकरता बंदरांमधे आणि जहाजनिर्मितीत मजबूत पायाभूत सुविधा देण्यात येत आहेत असं  केंद्रीय बंदर, नौकानयन आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी सांगितलं. मुंबईत आयोजित चर्चासत्रात आज ते बोलत होते. बंदरांच्या मानांकन प्रणालीचं तसंच राष्ट्रीय एकीकृत बंदर व्यवहार प्रणालीचं उद्धाटन यावेळी सोनोवाल यांच्या हस्ते झालं. भारत ग्लोबल कन्सोर्टियम या मंचाचं तसंच मैत्री या माहिती प्रणालीचं उद्धाटनही सोनोवाल यांच्या हस्ते झालं.

<><><><><>

उद्योगांनी सरकारवर अवलंबून न राहता स्पर्धेत उतरावं असं आवाहन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी उद्योजकांना केलं. ते आज मुंबईत आयएमसी चेंबर ऑफ कॉमर्सने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. अनुदान, उच्च आयात शुल्क अशा सरकारच्या मदतीवर कधीपर्यंत अवलंबून राहणार असा प्रश्न त्यांनी विचारला. एक देश म्हणून या सुरक्षित वातावरणातून आणि बचावात्मक पावित्र्यातून बाहेर पडणं गरजेचं आहे,  नवोन्मेष, उत्पादकता वाढवणं, कौशल्य आणि कार्यक्षमता सुधारणं यातून स्पर्धात्मकता वाढेल असं गोयल म्हणाले. आपण जोपर्यंत स्पर्धात्मक होत नाही, जगासोबतचा व्यापार वाढता नाही तोपर्यंत देशाला विकसित

करण्याचं १४० कोटी नागरिकांचं ध्येय साध्य होणार नाही, असं गोयल म्हणाले.

<><><><><>

सामाजिक कार्यकर्ते नानाजी देशमुख यांच्या कार्याचा केद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गौरव केला आहे. ते नानाजी देशमुख यांच्या १५ व्या पुण्यतिथीनिमित्त मध्यप्रदेशात चित्रकूटमध्ये आयोजित कार्यक्रमात बोलत होते. काही व्यक्ती शतकातल्या सामाजिक बदलांवर आपला मोठा प्रभाव सोडतात. त्यांच्यामुळेच हा बदल घडत असतो असंही ते म्हणाले.

<><><><><>

एसटी महामंडळाच्या सर्व बसेसमध्ये सीसीटीव्ही आणि जीपीएस यंत्रणा तातडीनं लावाव्यात, सर्व बसस्थानक आणि आगारांचे तातडीने सुरक्षा लेखापरीक्षण  करण्याच्या सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या आहेत. पुण्यातल्या स्वारगेट एसटी बस स्थानकात शिवशाही बसमध्ये तरुणीवर अत्याचार झाल्याचं उघड झाल्यानंतर राज्यातील सर्व बस डेपोंमध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याचा निर्णय बैठकीत झाला.

<><><><><>

कमी जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर भरल्याची नोटीस मुंबईतल्या जीएसटी उपायुक्तांनी एलआयसीला पाठवली आहे. २०२०-२१ या आर्थिक वर्षात २४२ कोटी २३ लाख रुपये कमी जीएसटी भरला, त्यावर २१३ कोटी रुपये ४३ लाखांचे व्याज आणि २४ कोटी २२ लाख रुपयांचा दंड

असे ४७९ कोटी ८८ लाख रुपये भरण्याची नोटीस एलआयसीला मिळाली आहे.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षात भारताच्या माहिती तंत्रज्ञान उद्योगानं २८२ अब्ज डॉलरचा महसूल मिळवला आहे. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभेची लोकलेखा समिती विधानसभेत सादर झालेल्या कॅगच्या अहवालाची तपासणी करणार आहे. आप सरकारनं २०२१ पासून राबवलेल्या मद्य धोरणामुळे राज्याचं २ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचं या अहवालात म्हटलं आहे. भाजपा सदस्यांनी या अहवालातल्या आरोपांची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी केल्यानंतर हे विधानसभा अध्यक्ष विजेंदर गुप्ता यांनी हे आदेश दिले.

**<><><><><>**

छत्तीसगडमधे सुकमा जिल्ह्यात ४ नक्षलवाद्यांना पोलिसांनी नुकतीच अटक केली. चिंतलनर भागात गस्तीच्या वेळी पोलिसांना लक्ष्य करण्यासाठी स्फोटकं पेरण्याचा नक्षलवाद्यांचा डाव होता. या चौघांना अटक केल्यावर त्यांच्याकडून स्फोटकं, आणि स्फोट घडवण्यासाठी लागणारं साहित्य जप्त केलं असल्याचं आज पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात दोन जहाल नक्षलवाद्यांनी आज जिल्हा पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलापुढं आत्मसमर्पण केलं. कांता उर्फ कांतक्का उर्फ मांडी गालू पल्लो, आणि सुरेश उर्फ वारलू ईरपा मज्जी अशी त्यांची नावं आहेत. त्यांच्यावर एकूण १८ लाख रुपयांचं बक्षीस शासनानं जाहीर केलं होतं.

**<><><><><>**

तेलंगणातल्या बोगदा कोसळल्यानं आत अडकलेल्या मजूरांशी संपर्क साधण्यासाठीचे प्रयत्न अधिक तीव्र करण्यात आले आहेत. या बोगद्यात मोठ्या प्रमाणात पाणी असल्यानं बचाव कार्यात अडथळे येत आहेत.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशात आज जोरदार पाऊस तसंच बर्फवृष्टी झाली. पाऊस आणि बर्फवृष्टीमुळे अटल बोगदा, दोन राष्ट्रीय महामार्ग आणि २११ रस्त्यावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. लाहौल स्पिती जिल्ह्यात पावसामुळे वीज पुरवठा विस्कळित झाला आहे. जोरदार पावसामुळे जिल्ह्यातल्या शाळा आणि प्रशासकीय कार्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे.

**<><><><><>**

वेव्हज परिषदेच्या निमित्तानं केंद्र सरकारनं खादीच्या वापरासंदर्भात एका स्पर्धेचं आयोजन केलं आहे. खादीला जागतिक पातळीवर फॅशनमध्ये महत्त्वाचं स्थान मिळवून देण्यासाठी ही स्पर्धा आहे. डिजिटल, प्रिंट, व्हिड़ीओ आणि इतर प्रायोगिक माध्यमांमध्ये खादीचा प्रयोग करण्याचं आव्हान यात आहे. या स्पर्धेसाठी १५ मार्च पर्यंत नाव नोंदणी करता येईल.

<><><><><>

युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन दर लेयन यांचं आज नवी दिल्लीत २ दिवसांच्या भेटीवर आगमन झालं. युरोपीय संघातल्या देशांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या या आयोगाच्या नवीन सदस्यांचा हा पहिलाच युरोपबाहेरचा दौरा आहे. एकूण २७ प्रतिनिधींपैकी २२ प्रतिनिधी या दौऱ्यात सहभागी झाले आहेत. या शिष्टमंडळानं आज परराष्ट्रव्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर यांना भेटून चर्चा केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर उद्या प्रतिनिधीमंडळ पातळीवर त्यांची चर्चा होईल.

<><><><><>

ऑस्कर पुरस्कार प्राप्त हॉलिवूड अभिनेते जीन हॅकमॅन पत्नीसह आपल्या निवासस्थानी मृतावस्थेत आढळून आले. ते ९५ वर्षांचे होते. फ्रेन्च कनेक्शन, अनफरगिव्हन आणि सुपरमॅन या चित्रपटातल्या भूमिकांसाठी हॅकमॅन ओळखले जात. नायक आणि खलनायक अशा दोन्ही भूमिकांसाठी हॅकमॅन प्रसिद्ध होते.

सहा दशकांहून अधिक काळ चित्रपटांमधे काम करताना त्यांना दोन अकादमी पुरस्कार, दोन बाफ्टा पुरस्कार, चार गोल्डन ग्लोब, एक स्क्रीन ॲक्टर्स गिल्ड पुरस्कार आणि एक सिल्व्हर बेअर पुरस्कार मिळाले होते.

<><><><><>

युक्रेनचे अध्यक्ष वोल्दिमिर झेलेन्स्की उद्या वॉशिंग्टनमध्ये व्हाइट हाऊसला भेट देणार असल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. युक्रेनमधल्या दुर्मिळ खनिजांच्या उत्खननाचे अधिकार

अमेरिकेला देण्यासाठीच्या करारावर या भेटीत स्वाक्षरी होईल. रशिया - युक्रेन युद्धाच्या संदर्भातही यावेळी करार होण्याची शक्यता आहे. झेलेन्स्की यांनीही या कराराला दुजोरा दिला आहे.

**<><><><><>**

महिलांच्या प्रिमिअर लिग क्रिकेट स्पर्धेत आज बंगळुरुमध्ये रॅायल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात जायंट्स यांचा सामना सुरु आहे. गुजरात जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

रॅायल चॅलेंजर्स बंगळुरुची सुरुवात खराब झाली. कर्णधार स्मृती मंधानासह त्यांचे तीन फलंदाज झटपट बाद झाले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा त्यांच्या १५ षटकात ५ बाद ९१ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत नागपूर इथं सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज विदर्भाचा पहिला डाव ३७९ धावांवर संपला, तर केरळच्या पहिल्या डावात दिवसअखेर ३ बाद १३१ धावा झाल्या.

**//<><><><><>//**